HAPPY BIRTHDAY

प्रशांत दामले
अभिनेते

संतोष कोचरेकर
नाट्यनिर्माता

हेमंत राठी
रामबंधू मसाले

अजित जोशी
प्रोफेसर

सुनीताताई शिंदे
माजी विश्वस्त, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास

प्रकाश वाघ
वकील, मुंबई उच्च न्यायालय

गोट्या सावंत
नाट्यनिर्माता

पंचांग

मंगळवार, ५ एप्रिल २०१६

भारतीय सौर १६ चैत्र शके १९३८, फाल्गुन कृष्ण त्रयोदशी रात्री १२.०४ पर्यंत, **चंद्रनक्षत्र:** शततारका सकाळी १०.३४ पर्यंत, **चंद्रराशी:** कुंभ उ. रात्री २.४७ पर्यंत, **सूर्यनक्षत्र:** रेवती, **सूर्योदय:** सकाळी ६.३२, **सूर्यास्त:** सायं. ६.५२, **चंद्रोदय:** पहाटे ४.३७, चंद्रास्त: सायं. ४.५४.

पूर्ण भरती: सकाळी १०.३४, पाण्याची उंची ३.९७ मीटर, रात्री ११.००, पाण्याची उंची ४.४१ मीटर.

पूर्ण ओहोटी: पहाटे ४.२६, पाण्याची उंची १.२० मीटर, सायं. ४.२८, पाण्याची उंची ०.९९ मीटर.

दिनविशेष: भौमप्रदोष; शिवरात्री; मधुकृष्ण त्रयोदशी; वारूणी योग सूर्योदयापासून सकाळी १०.३४ पर्यंत.

राशिभविष्य

मेष : बौद्धिक क्षेत्राला वाव.
वृषभ : विश्वास टाकू नका.
मिथुन : नोकरीत सुलभता.
कर्क : कामात व्यत्यय संभवतो.
सिंह : अडथळे संभवतात.
कन्या : प्रवासाचे योग येतील.
तूळ : अध्ययनात चांगला दिवस.
वृश्चिक: वर्तणूक चांगली ठेवा.
धनु : आप्तांच्या भेटी होतील.
मकर : थोरांचे मार्गदर्शन लाभेल.
कुंभ : कामात व्यग्र राहाल.
मीन : अडथळे दूर होतील.

BHAVISHYA.MAHARASHTRATIMES.COM

मटा कौल

कालचा प्रश्न :
त्र्यंबकेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात पुरुषांना नाकारलेला प्रवेश ही महिलांना प्रवेश देण्याची वेळ येऊ नये, यासाठी करण्यात आलेली खेळी आहे, असे वाटते काय?

८० २०

आजचा प्रश्न :
पनामा प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेला तपासगट ५०० भारतीयांचा तपास करण्यात यशस्वी होईल असे वाटते का?

पुस्तक विश्व

प्रकल्प व्यवस्थापन

प्रोजेक्ट मॅनेजमेंट किंवा प्रकल्प व्यवस्थापन हा अलीकडील काळात परवलीचा शब्द बनला आहे. मात्र, या विषयात मराठीतून अद्याप लेखन झालेले नाही. हा विषय मराठीतून समजावून सांगण्याचा प्रयत्न राजीव एलकुंचवार यांनी या पुस्तकातून केला आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागात धोरण-व्यवस्थापन प्रक्रियेसंबंधात चर्चा केली आहे. त्यात धारणाशक्ती, कंत्राट, तंत्रज्ञान, अर्थ आदींच्या व्यवस्थापनाविषयी सांगितले आहे. दुसऱ्या भागात नियंत्रण प्रक्रियेविषयी माहिती दिली आहे. यात गुणवत्ता नियंत्रण, आरोग्य, सुरक्षा, माहिती तंत्रज्ञान, पर्यवेक्षण, निविदा आदींवर चर्चा केली आहे. तिसऱ्या भागात कार्यव्यवस्थापन प्रक्रियेविषयी माहिती मिळते. व्याख्या टप्पा, अंमलबजावणी टप्पा, क्रियान्वयन टप्पा, संचालन टप्पा आदींची त्यात माहिती आहे.



हे पुस्तक BookGanga.com वर उपलब्ध आहे. मोफत घरपोच सेवा + १० टक्के सूट यासाठी संपर्क क्र. ८६००७४१११०/ ७५१११०/ ७६१११०. 'COD उपलब्ध' * अटी लागू

कचरामुक्ती

देवनार, मुलंड या डम्पिंग ग्राऊंडच्या प्रश्नाने मुंबईला ग्रासले आहे. सध्या जाणवणारी समस्या हे हिमनगाचे टोक आहे. सर्वच नगरांना, महानगरांना डम्पिंगच्या प्रश्नाने घेरले आहे. मुंबईत ही नेमकी समस्या का उद्भवली आणि त्यावर मात करण्यासाठी कोणते पर्याय आहेत, याचा उहापोह 'मुंबईची कचरामुक्ती' या 'मटा'च्या नवीन मोहिमेत केला जाणार आहे. समस्या, उपाय, पर्याय आणि सहभाग या चार सूत्रांवर आधारित ही मोहीम आजपासून सुरू होत आहे.

प्रतिक्रियांसाठी!

मोहिमेत काय हवे, सहभाग कसा घेता येईल...तुमच्या प्रतिक्रिया कळवा या इमेलवर mtmumbai2016@gmail.com

अनास्थेचे डम्पिंग

देवनार, मुलुंडची समस्या शिवसेना, पालिका प्रशासनाच्या निष्काळजीमुळे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

देवनार आणि मुलुंड डम्पिंग ग्राऊंडमध्ये लागणाऱ्या आगीमुळे मागील काही महिन्यांपासून पूर्ण मुंबई धुमसते आहे. कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून पुढील २५ वर्षांत दोन्ही डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याचे सन २००७मध्ये पालिकेने निश्चित केले. मात्र, सत्ताधारी शिवसेना व पालिका प्रशासनाच्या अनास्थेमुळे डम्पिंग ग्राऊंड बंद न होता कचऱ्याचा धूर आणखीनच धुमसू लागला आहे. त्याचे फलीत म्हणजे सध्या डम्पिंगमध्ये लागणाऱ्या आगी आहेत.

देवनार डम्पिंग ग्राऊंडमध्ये पावसाळा वगळता मागील अनेक वर्षांपासून कचऱ्याला आगी लागण्याचे प्रकार घडत आहेत. देवनारपासून चेंबुर, कुर्ल्यापर्यंतचे नागरिक कचऱ्याची दुर्गंधी आणि धूर वर्षानुवर्षे सहन करीत जगत आहेत. तीन महिन्यांपूर्वी अधिक मोठ्या प्रमाणात आग लागली आणि त्याचा धूर मुंबई आणि नवी मुंबईच्या आसमंतात कोंडला गेल्याने देवनारच्या आगीची धग पूर्ण राज्याला लागली. त्यामुळे महापालिका आणि राज्य सरकारची ढिम्म यंत्रणा कामाला लागली.

मुंबईतील वाढत्या कचऱ्याचा प्रश्न दहा वर्षांपूर्वीच ऐरणीवर आला होता. मालाडचे चिंचोली आणि गोराई डम्पिंग ग्राऊंडमधून येणारी दुर्गंधी स्थानिक नागरिकांना त्रासदायक ठरू लागली. या भागातील बांधकामांचे दर झपाट्याने खाली येऊ लागल्यानंतर नागरिकांनी आंदोलनाचा बडगा उगारला. आधी चिंचोली डम्पिंग बंद झाले. त्यानंतर सतत पाच वर्षांच्या आंदोलनानंतर गोराई डम्पिंग बंद करण्याचा निर्णय पालिकेला घ्यावा लागला. परिणामी या दोन्ही डम्पिंग ग्राऊंडचा सर्व भार देवनार आणि मुलुंडवर आला.

देवनार डम्पिंग ग्राऊंडची क्षमता ४० वर्षांपूर्वी, तर मुलुंडची २००३मध्ये संपली आहे. कचरा टाकण्यास मोठी जागा मुंबई आणि एमएमआर परिसरात नसल्याने जुन्याच डम्पिंगमध्ये कचरा कोंबला जाऊ लागला. देवनारमध्ये सध्या ३५ ते ४० मीटर म्हणजे आठ ते दहा मजल्याच्या इमारतींच्या उंचीइतके कचऱ्याचे डोंगर तयार झाले आहेत. ही दोन्ही डम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्त पद्धतीने बंद करून तेथे शून्य परिसर निर्माण करण्याचे उद्दिष्ट आखण्यात आले. कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून वीजनिर्मिती करण्याचे ठरले. या कामासाठी प्रत्येकी पाच हजार कोटी रुपयांचे कंत्राट कंत्राटदारांना देण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी तरतूद	
२०१२	१,३२,००० कोटी
२०१३	१,४२,२७५ कोटी
२०१४	१,५२,६२९ कोटी
२०१५	१,६२,६४४ कोटी
२०१६	१,७२,८५२ कोटी

कंत्राटदाराने नियोजित वेळेत काम पूर्ण केले नाही. त्यामुळे प्रकल्प रखडल्याचा ठपका ठेवत पालिकेने दोन्ही डम्पिंग ग्राऊंडची कंत्राटे रद्द केली असून, मुलुंडचे टेंडर अंतिम टप्प्यात आहे, तर देवनारसाठी येत्या तीन महिन्यांत नव्याने टेंडर मागवले जाणार आहे. तब्बल आठ वर्षे कोणतीही प्रक्रिया न होता डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न चिघळत रहिला.

गेल्या काही महिन्यांत लागलेल्या आगीवगळता प्रकल्प का रखडले याबाबत सत्ताधारी म्हणून शिवसेनेकडून कोणताही पाठपुरावा झाल्याची नोंद पालिका दफ्तरी नाही.

काम रखडल्याबद्दल प्रशासनाने जुन्या कंत्राटदारांना नोटिसा आणि दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला. मात्र, त्यापलीकडे जाऊन कंत्राट रद्द करण्याचा इशारा पालिकेने दिलेला नाही. कंत्राटाच्या साटेलोट्यात वरिष्ठ राजकीय नेत्यांच्या दबावाखाली पालिकेने नांग्या टाकल्या. त्यामुळे कोणतेही काम न करता तब्बल आठ वर्षे वाया गेली. अन्यथा प्रकल्पाची पहिल्या टप्प्यातील सुरुवात झाली असती, असे पर्यावरणवादी कार्यकर्ते सांगतात.

येत्या काळात देवनार, कांजुर, मुलुंड या तिन्ही डम्पिंग ग्राऊंडमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभे राहात आहेत. या प्रकल्पांची प्रशासकीय प्रक्रिया वेगाने सुरू आहे. कांजूरमध्ये बायोरिॲक्टरमार्फत सध्या रोज तीन हजार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया सुरू झाली आहे.
- विजय बालमवार,
उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग
मुंबई महापालिका

डम्पिंग प्रदूषण मुंबईभर

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील प्रदूषणाचा त्रास फक्त त्याच भागातील रहिवाशांपुरता मर्यादित राहिलेला नसून, वाऱ्याबरोबर प्रदूषित वायू संपूर्ण मुंबईभर पसरत आहे. मुंबईतील वाढत्या धूळ-प्रदूषणामुळे लहान मुलांमधील आजारही वाढत आहेत. वारंवार होणारी सर्दी, संसर्गजन्य ताप, दमा अशी लक्षणे लहान वयातच मुलांमध्ये दिसू लागली असून, मुंबईत सरासरी २५ टक्के लहान मुलांमध्ये प्रदूषणाशी संबंधित आजार आढळून येत आहेत.

मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राऊंडमुळे प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला. या प्रदूषणामुळे चेंबूर, गोवंडी, मानखुर्दमधील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. सातत्याने लागणाऱ्या आगी, त्यातून निर्माण होणारे धुराचे लोट, दुर्गंधी, कचऱ्यातून निर्माण होणारे विषारी वायू यांमुळे आसपासच्या नागरिकांचे जगणे कठीण झाले असतानाच, आगीचा धूर व प्रदूषित वायू वाऱ्याबरोबर मुंबईच्या इतर भागातही पसरत असून, त्यामुळे बहुतेक मुंबईकरांना त्रास सोसावा लागत आहे. मुंबईत गेल्या काही वर्षात प्रदूषणात वाढ झाली असून, वेगवेगळ्या कारणांमुळे धुलीकणांचे प्रमाणही वाढत आहे.

लहान मुलांमधील आजार वाढले

देवनारसह मुंबईतील इतरही डम्पिंग ग्राऊंडच्या प्रदूषणामुळे फुफ्फुसांचेच आजार होत नसून, संपूर्ण शरीरावरच त्याचा परिणाम दिसून येत आहे. शरीरात ऑक्सिजनबरोबर प्रदूषित कणही प्रवेश करतात आणि हृदयापासून बहुतेक सर्व अवयवांवर त्याचा परिणाम होतो. कार्बन मोनॉक्साइडचा थेट परिणाम मेंदूवर होतो, असे नानावटी हॉस्पिटलचे छाती विकार तज्ज्ञ डॉ. सलील बेंद्रे सांगतात. प्रदूषणाचा मेंदूवर परिणाम झाला तर लक्ष केंद्रीत होत नाही. झोप येत नाही, चिडचिडेपणा, थकवा येणे, डोकेदुखी अशा तक्रारी वाढतात. त्याशिवाय अस्थमा, ॲलर्जी, डोळे चुरचुरणे असा आजारही दिसून येतात. धुळीचा व प्रदूषणाचा अप्रत्यक्ष परिणाम रक्तदाबावरही होतो. डोकेदुखी, चिडचिडेपणामुळे सतत राग येत राहिला, झोप कमी झाली तर त्याचा परिणाम रक्तदाबावर होतो याकडे डॉ. बेंद्रे यांनी लक्ष वेधले.

धोकादायक मिथेन वायू

आयआयटीने दिलेल्या अहवालानुसार देवनार डम्पिंग ग्राउंडच्या कचऱ्याखाली अंदाजे १२७ लाख टन मिथेन वायू दबलेला आहे. या ज्वलनशील वायूमुळे माणसाचा गुदमरून मृत्यू होतो. मिथेन वायू हवेतील प्राणवायूची जागा घेतो. परिमामी हवेतील प्राणवायूचे प्रमाण कमी होते. मिथेन वायूमुळे प्राणवायूचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा कमी झाले तर मृत्यू ओढवू शकतो, अशी माहिती पालिका हॉस्पिटलमधील एका डॉक्टरने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

लहानग्यांना त्रास

धूळ व प्रदूषणामुळे लहानग्यांमध्ये हल्ली अनेकदा वारंवार सर्दी, संसर्गजन्य ताप व दम्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. साधारण १०० मुलांपैकी सरासरी २० ते २५ टक्के मुलांमध्ये प्रदूषणाशी निगडित आजार आढळून येतात. दम्याच्या वाढत्या प्रमाणामागे प्रदूषण हेच प्राथमिक कारण आहे. मुंबईच्या अनेक भागात प्रदूषणाशी निगडित आजार आढळून येत आहेत.
-डॉ. सलील बेंद्रे,
पल्मनरी मेडिसीन विभागप्रमुख,
नानावटी हॉस्पिटल

डॉक्टर दांपत्याविरूद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

एका गर्भवती महिलेच्या पोटातील मृत अर्भक काढण्यासाठी तातडीने उपचार न दिल्याने महिलेचा मृत्यू झाल्याबद्दल अंधेरी (पू.) येथील 'ॲपेक्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल'च्या डॉ. अनघा सोनटक्के आणि डॉ. महेश सोनटक्के या डॉक्टर दांपत्याविरुद्ध साकीनाका पोलिसांनी सोमवारी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणी दोघा परिचारिकांविरुद्धही गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

गर्भवती महिलेच्या मृत्यूस धरले जबाबदार

महादेव नितवडेकर (२८) यांची पत्नी सविता (२४) ही गर्भवती असल्याने तिला ॲपेक्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. ५ ऑगस्ट, २०१४ रोजी सविताची तपासणी केली असता तिच्या पोटातील अर्भक चार दिवसांपूर्वीच मरण पावल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र, तिच्यावर सिझेरियन न करता नॉर्मल डिलिव्हरीचे औषध देण्यात आले. पत्नीची प्रकृती बिघडत असल्याचे पाहून दुसऱ्या दिवशी महादेव नितवडेकर यांनी डॉक्टरांना भेटून पत्नीवर सिझेरियन करण्याची विनंती केली. मात्र, डॉक्टरांनी त्याकडे दुर्लक्ष केले, असे महादेव यांचे म्हणणे आहे. त्याशिवाय सविताला दुसऱ्या हॉस्पिटलला नेण्याचे महादेव यांनी ठरवले असता, त्याची परवानगीही नाकारण्यात आली. तिसऱ्या दिवशी सविताचे शरीर काळेनिळे पडले आणि अखेर दुपारी तीनच्या सुमारास सविता मरण पावली.

या घटनेने प्रचंड मानसिक धक्का बसलेल्या महादेव यांनी डॉक्टर दाम्पत्याविरोधात साकीनाका पोलिसांकडे तक्रार केली होती. पोलिसांकडून काही कारवाई होत नसल्याने अखेर मार्चमध्ये महादेव यांनी आपल्या वकिलांमार्फत अंधेरी महानगर दंडाधिकारी न्यायालयाकडे तक्रार अर्ज केला. त्यात महानगर दंडाधिकारी ए.डी. लोखंडे यांच्यापुढे ॲड. प्रकाश वाघ व ॲड. विकास खरात यांनी त्यांची बाजू मांडली. न्यायालयाने तक्रारीची दखल घेऊन सविताच्या मृत्यूबद्दल साकीनाका पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास करावा, असा आदेश दिला. त्यामुळे सोमवारी साकीनाका पोलिसांनी सोनटक्के डॉक्टर दांपत्याविरुद्ध सदोष मनुष्यवधासह हलगर्जीपणा व सविताला दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेण्यास पतीला मनाई केल्याचा गुन्हा नोंदविला.

संगीतसमाधीचा अनुभव देणारा बासरीवादक

रसिकांना बासरीच्या माध्यमातून एका वेगळ्या जगात पोहोचवणारे बासरीवादक, टीव्हीच्या पडद्याच्या माध्यमातून ज्यांच्या बासरीवादनातील जादू प्रेक्षकांनी अनुभवली असे बासरीवादक, बासरीवादन म्हणजे शास्त्रीय संगीतच असणार, त्यात काय मजा येणार, हा सामान्य प्रेक्षकांचा समज खोडून काढणारे बासरीवादक अमर ओक. ओक पहिल्यादांच मुंबईमध्ये अमर बन्सी हा त्यांचा कार्यक्रम गुढीपाडव्याच्या पहाटे सादर करणार आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या निमित्ताने त्यांच्याशी मारलेल्या गप्पा...

'अमर बन्सी' कार्यक्रमाची निर्मिती कशी झाली?

■ आयडिया सारेगमप सुरू झाले आणि गायक मंडळींसोबतच वादक मंडळीही घराघरात पोहोचली. या गाण्यांच्या मध्ये आम्ही एकादा संगीताचा तुकडा सादर करायचो. तेव्हा लोकांना ते आवडायचे. मात्र, या कार्यक्रमात लहानसा तुकडा सादर झाल्याने त्यांना हा सांगीतिक अनुभव अजून अधिक प्रमाणात हवा, असे वाटायचे. यातून 'अमर बन्सी' कार्यक्रमाची निर्मिती झाली. केवळ वाद्यांच्या माध्यमातून आम्ही रसिकांना संगीत अनुभव द्यायला लागलो. २००८मध्ये पहिला कार्यक्रम झाला आणि आतापर्यंत १५५ प्रयोग झाले आहेत. मात्र, आतापर्यंत खुद्द मुंबईत या कार्यक्रमाचा एकही प्रयोग झाला नव्हता. सोऽऽहम् प्रतिष्ठानच्या माध्यमातून सादर होणाऱ्या या कार्यक्रमासाठी विनीत गोरे, श्रीकांत जोशी यांच्या सगळ्याच टीमचा मी आभारी आहे.

या कार्यक्रमामध्ये किती बासऱ्यांचा वापर होतो?

■ तबला, ढोलक-ढोलकी, दर्बुका हे दक्षिण आफ्रिकेतील वाद्य, ऑक्टोपॅड, की-बोर्ड या वाद्यांसोबत मी एकूण ३० बासऱ्या वाजवतो. या बासऱ्या ६ इंचांपासून ३८ इंचांपर्यंतची असतात. प्रत्येक बासरीचा कुठे व कसा वापर होऊ शकतो, विविध गाण्यांमध्ये हा वापर कसा केला आहे, याचे प्रात्यक्षिक दाखवले जाते. शास्त्रीय, सुगम संगीत, भक्तिगीत, अभंग, गजल, कव्वाली, लावणी, हिंदी गाणी असा वैविध्यपूर्ण अनुभव या कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना दिला जातो. यात आरडींनी ट्रेनचा आवाज काढण्यासाठी केलेला पॉलिश पेपरचा वापर किंवा पाण्याच्या बाटलीचा उपयोग करून नाद निर्माण केला जातो आणि हा नाद ज्या गाण्यांमध्ये वापरला आहे ती गाणी सादर केली जातात. याच कार्यक्रमात आमची जुगलबंदीही रंगते.

टॉक टाइम

अमर बन्सी गुढीपाडवा पहाट
- ८ एप्रिल, पहाटे ६.३० दीनानाथ नाट्यगृह
- प्रवेश विनामूल्य, सन्मानिका नाट्यगृहावर उपलब्ध

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

आतापर्यंत मिळालेला सन्मान, प्रतिक्रिया याबद्दल काय सांगता येईल?

■ लोकांनी मागणी केली म्हणून हा कार्यक्रम सुरू झाला. अनेकदा बासरी वादन म्हणजे केवळ शास्त्रीय संगीत असणार अशा जाणीवेतून प्रेक्षक येतात. कार्यक्रमाला येण्याआधी अर्ध्या तासात निघायचे अशी मनाची तयारी त्यांनी केलेली असते. मात्र, कार्यक्रम संपेपर्यंत हे प्रेक्षक जागेवरून हलत नाहीत, ते अक्षरश: मंत्रमुग्ध होतात आणि नंतर येऊन याची कबुली देतात, हा सर्वात मोठा गौरव असतो. या व्यतिरिक्त पं. हृदयनाथ मंगेशकर, श्रीनिवास खळे, प्यारेलाल, सुधीर फडके अशा दिग्गजांनी लाइव्ह कार्यक्रमात दाद दिली आहे. हे मोठे संचित आहे. पं. हरिप्रसाद चौरसिया यांनीही १५०व्या कार्यक्रमाला आशीर्वाद दिले.

डायरी

मुंबई

हजरत ख्वाजा सुफी माजीदल्हसन शाह हसनी : उर्स मुबारक, कुरआन रबानी, मेहफील ए जहांगीराया, ॲंटॉप हिल, स. ६ वा.

भाटिया हॉस्पिटल : व्याख्यान : 'छातीतील दुखणे', वक्ते : डॉ. गिरीश वासवानी, भाटिया हॉस्पिटल, सातवा मजला, ताडदेव, दु. ४ वा.

दादर माटुंगा कल्चरल सेंटर : मराठी चित्रपट महोत्सव, 'शेजारी' चित्रपट, वा. वा. गोखले, दादर माटुंगा कल्चरल सेंटर, सायं. ६ वा.

लोकवाङ्मय गृह : समता संघर्ष मार्गदर्शिका पुस्तक प्रकाशन, उपस्थिती : डॉ. भालचंद्र कानगो, निवृत्त न्या. हेमंत गोखले, ॲड. प्रकाश आंबेडकर, भुपेश गुप्ता भवन, तिसरा मजला, प्रभादेवी सायं. ६ वा.

ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्टस् मुंबई विश्वविद्यालय, द्वितीय वर्ष विद्यार्थी प्रस्तुत : 'दो और दो चार', उपस्थिती : रोहिणी हट्टंगडी, प्रा. डॉ. मंगेश बनसोड, मुक्ताकाश रंगमंच, विद्यानगरी, कलिना, सांताक्रूझ, सायं. ७ वा.

महाराष्ट्र टाइम्स आणि लोकमान्य सेवा संघ, पार्ले : मटा संवाद, सहभाग : राहुल देशपांडे, लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले, सायं. ७.३० वा

नेहरू सेंटर एसी गॅलरी: आनंद ठोंबरे यांच्या चित्रांचे प्रदर्शन, नेहरू सेंटर, वरळी, स. ११ वा. (११ एप्रिलपर्यंत.)

नेहरू सेंटर सर्क्युलर गॅलरी: अतुल गेंडले, चारुदत्त परिदे, अंकीत गुजर यांच्या चित्रांचे प्रदर्शन, नेहरू सेंटर, वरळी, स. ११ वा. (११ एप्रिलपर्यंत.)

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी: अंत्योदय पुरस्कार सोहळा, पुरस्कारविजेते: सुरेश पाटील, उप स्थिती: डॉ. संजय ओक, रेखा महाजन, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, १७ चंचल स्मृती, गं.द. आंबेकर मार्ग, वडाळा, सायं. ६ वा.

डायरी सदरात कार्यक्रम पाठवण्यासाठी ई-मेल : matadiary@gmail.com

महाराष्ट्र टाइम्स CITIZEN REPORTER

MT CITIZEN REPORTER हे ॲप डाऊनलोड करा

ANDROID APP ON Google play

Download from Windows Phone Store

- बातम्या आणि त्याच्याशी निगडित फोटो, तसेच वाचकांनी निदर्शनास आणून दिलेल्या समस्या, बातम्या यांच्यासाठी हा उपक्रम आहे.
- त्यावर फॉरवर्डेड, लांबलचक संदर्भहीन मेसेज पाठवू नयेत.
- शुभेच्छा संदेश, अश्लील मेसेज, फोटो पाठवू नयेत.

वाचक वार्ताहर इम्पॅक्ट

बेवारस तारा हटल्या

'महाराष्ट्र टाइम्स'च्या २३ मार्चच्या अंकात सिटिझन रिपोर्टरमध्ये 'बेवारस तारा हटविल्या' हा मजकूर प्रसिद्ध झाला. त्याची दखल घेतल्याने समस्या सुटली आहे. 'मटा'चे आभार.
- मंगेश गावडे

वाचक वार्ताहर इम्पॅक्ट

काळ्या मार्बलवर पॉलिश सुरू

'महाराष्ट्र टाइम्स'च्या २८ मार्चच्या सिटिझन रिपोर्टरमध्ये 'काळ्या मार्बलचा त्रास' या शीर्षकाखाली कांजुरमार्ग स्टेशनवरील समस्या मांडली होती. मध्य रेल्वेने त्याची दखल घेत काळ्या मार्बलवर पॉलिश करणे सुरू केले आहे. त्याबद्दल रेल्वे आणि 'मटा सिटिझन रिपोर्टर'चे आभार.
- अभिजीत कापशीकर

बस थांबा की स्वच्छतागृह?

ठाण्यातील ग्लॅड्स अल्वारिस मार्गावर एक सुशोभित बसथांबा आहे. या थांब्यावर कोणतीही बस थांबत नाही; परंतु, या थांब्याचा वापर पादचारी, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, दुचाकीस्वार, ट्रक-टेम्पोचालक, खासगी वाहनचालक सार्वजनिक स्वच्छतागृहासारखा वापर करताना दिसतात. कृपया प्रशासनाने याकडे लक्ष देत हा थांबा त्वरित रद्द केल्यास ही दुर्गंधी थांबेल.
- चंद्रशेखर साळवी

सिग्नल दिसेल असा लावा

मुलुंड येथील निर्मल लाइफस्टाइल येथील कामगार हॉस्पिटलजवळील सिग्नलकडे विजेचा खांब आहे. या खांबामुळे सिग्नल योग्यप्रकारे दिसत नाही. प्रशासनाने त्यावर तोडगा काढावा. त्यामुळे रस्ते वाहतूक सुरळीत होईल.
- विनायक पाथरे

डीपी बॉक्स उघड्यावर

वसई येथील आनंदनगर येथे बऱ्याच दिवसांपासून डीपी बॉक्स उघडे आहेत. त्यापैकी एक बॉक्स मुलांचा हात पोहोचेल एवढ्या उंचीचे असून, त्यामुळे एखादवेळी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महावितरणचे अधिकारी याकडे नेहमी डोळेझाक करत आहेत. त्यावर तातडीने कारवाई करून नवीन बंद बॉक्स बसवावेत.
- सुनील माणके

कुर्ला हार्बर पूल

कुर्ला प्लॅटफॉर्म क्र. ७ आणि ८ येथे प्रवाशांचे प्रचंड हाल होतात. प्रामुख्याने मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांना त्याचा त्रास होतो. त्यासाठी घाटकोपर, ठाणे येथे ज्याप्रकारे पूल आहेत, तसे पूल बनवावेत.
- संदीप मांडलेकर